# समाज कल्याणासाठी गावागावांत बालसंस्कार केंद्रे उभारा : मोरे

**आजचे कार्यक्रम**

*हुतात्मा स्मारकात विधवा सन्मान दिनानिमित्त कार्यक्रम दुपारी १२ वाजता

*प्रेम फाउंडेशन नाशिक व एन.जी.ओ फोरम नाशिक यांच्यावतीने जागतिक विधवा महिला दिनाच्या निमित्ताने विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान नाशिक यांच्यावतीने राष्ट्रीय विधवा प्रथा निर्मूलन कायदा व्हावा, यासाठी राष्ट्रीय विचार - विमर्श परिषदेचे आयोजन स्थळ :श्री लक्ष्मी नारायण चॅरिटेबल ट्रस्ट तपोवन, पंचवटी नाशिक

*जिल्हा सहकार बोर्ड, बँक असोसिएशन, नागरी पतसंस्था फेडरेशन, पगारदार पतसंस्था, सहकार भारती विविध शिक्षण संस्था पदाधिकारी यांची ठेवी परत मिळविण्यासाठी सहविचार सभा, दुपारी ३ वा. मविप्र सेवक सोसायटी कार्यालयात.

*जनसंघ पक्षाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक नंदकिशोर चंद्रात्रे यांचे व्याख्यान, दुपारी ४.३० वाजता भाजपा कार्यालय, वसंतस्मृती, एन. डी. पटेल रोड.

**नाशिक । प्रतिनिधी**

नव्या पिढीवर सुसंस्कार व्हावेत आणि त्याचबरोबर उपवर मुला-मुलींच्या विवाहाचा प्रश्नही सुटावा, यासाठी सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सेवामार्गातर्फे गावागावात बालसंस्कार केंद्र आणि विवाह मंडळे उभारा, अशी स्पष्ट सूचना अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्गाचे प्रमुख गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांनी केली.



श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील गुरुपीठामध्ये (२१जून) मासिक महासत्संग अपूर्व उत्साहात पार पडला. यावेळी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिर आणि रक्तदान शिबिरही घेण्यात आले. सेवेकऱ्यांना संबोधित करताना गुरुमाऊली मोरे म्हणाले की, इतर आध्यात्मिक सेवा कमी झाल्या तरी चालतील, मात्र समाजाला आवश्यक असलेल्या मूल्य संस्काराची चळवळ अधिकाधिक गतिमान झाली पाहिजे. त्यासाठी यापुढे दैनिक स्वरूपाची सेवा केंद्रे उभारण्याचा प्रयत्न करू नका तर ग्राम अभियानाच्या माध्यमातून गर्भ शिशू आणि मूल्य संस्काराचे



कार्य घराघरात पोहोचवा. नव्या पिढीवर सुसंस्कार झाले तर श्रावणबाळ आणि पुंडलिकासारखी आज्ञाधारी पिढी तयार होईल आणि हीच पिढी पुढे देश, धर्म आणि समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी चंद्रकांत मोरे, नितीन मोरे, आबासाहेब मोरे उपस्थित होते.

## इंदिरानगर येथे श्रमदान

**इंदिरानगर ।** जागतिक योग दिनानिमित्त बापू बंगल्याजवळ, सर्वात्मक वाचनालयाच्या मागे, इंदिरानगर येथे श्रमदान करण्यात आले. वृक्षसेवेत साफसफाई, वाळलेल्या पानांचे संकलन व झाडांवरील वेली काढणे, नवीन झाडे लावणे, प्लास्टिक व इतर कचऱ्याचे संकलन करण्यात आले. यावेळी नंदकुमार काळे यांच्या हस्ते तीन शोभेची झाडे लावण्यात आली. लीनाताई यांनी वृक्षरोप सप्रेम भेट दिले. यावेळी मोदकेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली.



पान १ वरून ....

## नाशिकला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांचा होणार विकास

शासन व सर्व संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथील मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या व्यापक बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस जलसंपदा तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार स्मिता वाघ, मध्य नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे, आमदार म गेश चव्हाण, सडक परिवहन मंत्रालयाचे सचिव व्ही. उमाशंकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अध्यक्ष यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नाशिक विभागीय आयुक्त तथा सिंहस्थ प्राधिकरण प्रमुख डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे, नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नाशिकला जवळपास महत्वाचे आठ मार्ग येतात. त्यात मुंबई, गुजरात, पालघर, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे या मार्गाने भाविक येतात. हे सर्व मार्ग सिंहस्थाच्या काळात महत्वाचे आहेत. याला जोडून नाशिकमधील व जिल्ह्यातील अंतर्गत रस्ते देखील राष्ट्रीय महामार्गाला जोडणारे आहेत. त्या सर्व रस्त्यांच्या विकासासंदर्भात बैठकीत विचार करण्यात आला. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी जवळपास सर्व रस्त्यांना तत्वतः मान्यता दिली आहे. लवकरच त्यासाठी डीपीआर करून त्याला निधी उपलब्ध करून देण्यात येईल आणि ते काम पूर्ण करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

## 'नाफेड'चा कांदा दर 'घसरणी'चा

दर निश्चित केले जात आहेत. या वर्षासाठी जाहीर केलेले दर व प्रत्यक्षात बाजार समितीत मिळणारे भाव यात मोठी तफावत आहे. नाफेड आणि एनसीसीएफकडून कांदा खरेदी करण्यासाठी प्रतवारी असलेल्या कांद्याचा निकष लावून खरेदी करण्याची अट आणि खुल्या बाजाराच्या तुलनेत कमी दर जाहीर करायचा अशी तऱ्हा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कुठलाच फायदा होत नसल्याचे दिसत आहे. शेतकरी हित डोळ्यांसमोर ठेवून कांदा खरेदीचे उद्दिष्ट असताना कमी दराने खरेदी करून नेमका फायदा कोणाला द्यायचा आहे? असा सवाल शेतकरी निवृत्ती न्याहारकर यांनी विचारला आहे.

आशिया खंडातील कांद्यासाठी प्रसिद्ध असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत शनिवारी (दि.२१) कांद्याची किमान ७०० रूपये, कमाल २,२०० रूपये तर सरासरी १,५८० रुपये क्विंटल दराने विक्री झाली होती.

नाशिक जिल्ह्यात यंदा २०२४-२५ या हंगामात उन्हाळ कांद्याचे उत्पादन ५९ लाख टन झाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ते ६३ टक्क्यांनी वाढले आहे. मागील हंगामात (२०२३-२४) कांदा उत्पादन ३६ लाख टन होते. ही वाढ मुख्यतः लागवडीखालील क्षेत्रात आणि अनुकूल हवामानामुळे झाल्याचे राज्य कृषी विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. चालू हंगामात २.५ लाख हेक्टर क्षेत्रावर कांद्याची लागवड झाली असून, हेक्टरी सरासरी २३.४ टन उत्पादन नोंदवले गेले. मे महिन्यातील अवकाळी पावसामुळे सुमारे १० टक्क्यांपर्यंत नुकसान झाले असले तरी हंगाम भरघोस राहिल्याने ऑक्टोबरपर्यंत पुरेसा पुरवठा उपलब्ध राहील, असे जाणकारांचे मत आहे.

उन्हाळी कांद्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची टिकाऊ गुणवत्ता! हा कांदा ६ ते ७ महिने कांदा चाळीत साठवून ठेवता येतो. शेतकऱ्यांना बाजारात योग्य भाव मिळेपर्यंत टप्प्याटप्प्याने विक्री करता येते. सध्या लासलगाव बाजार समितीत कांद्याचा सरासरी दर प्रतिक्विंटल १५८० रुपये आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील १,५०० रुपयांपेक्षा तो किंचित जास्त आहे.

## युद्धात अमेरिकेची उडी

लागत आहे. अमेरिकेने इराणच्या ३ अणूकेंद्रांवर हल्ले केल्याने इराण-इस्रायल संघर्षात अमेरिका थेट उतरल्याचे यातून स्पष्ट झाले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधून देशाला संबोधित केले. इराणची महत्त्वाची अणूकेंद्रे पूर्णपणे नष्ट करण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. अमेरिकेच्या हल्ल्याने इराणने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केल्याचा आरोप इराणचे परराष्ट्र मंत्री सैयद अब्बास अराघची यांनी केला. इराणवरील हल्ल्यासाठी अमेरिकेने जगातील सर्वात महागडी आणि घातक युद्ध यंत्रणा मैदानात उतरवली आहे. अमेरिकेने अत्याधुनिक 'बी-२' स्पिरिट स्टील्थ बॉम्बर्सचा वापर केल्याचे म्हटले जात आहे.

### युरेनियम सुरक्षितस्थळी; इराणचा दावा

अमेरिकेच्या हल्ल्याआधीच इराणने युरेनियम सुरक्षितस्थळी हलवले होते. अमेरिकेने तीन अणुस्थळांवर हल्ला केला; तेथे कोणतीही अणूगळती झालेली नाही, असा दावा इराणने केला आहे. इराणच्या तीन अणुस्थळांवर हल्ला करून ती नष्ट केल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. तो दावा इराणने फेटाळला आहे. हा हल्ला युद्धाची अनावश्यक कारवाई आहे. त्याचा बदला घेतल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा इराणने अमेरिकेला दिला आहे.

### हल्ला करणे गुन्हेगारी : अराघची

इराणचे विदेश मंत्री सईद अब्बास अराघची यांनी अमेरिकेच्या हल्ल्याचा निषेध केला. आंतरराष्ट्रीय कायदे, यूएन नेशन चार्टर, आणि अणवस्त्र अप्रसार कराराचे उल्लंघन या हल्ल्याने झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य असलेल्या अमेरिकेने शांततापूर्ण अणूकेंद्रांवर हल्ले करणे ही गुन्हेगारी आहे. आजचा हल्ला म्हणजे वाद वाढवण्याचा प्रयत्न आहे. त्याचा दीर्घकालीन परिणाम होईल, असे अराघची यांनी म्हटले आहे.

### पाकचा इराणला पाठिंबा

अमेरिकेने इराणच्या ३ प्रमुख अणूकेंद्रांवर हल्ला केला. त्या हल्ल्याचा पाकिस्तानने निषेध करून इराणला पाठिंबा दर्शवला आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने सोशल मीडियावर त्याबाबत पोस्ट केली आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला करून आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन केले आहे. इराणलाही स्व-सुरक्षेचा पूर्ण अधिकार आहे, हल्ल्यांचा आम्ही निषेध करतो. इराण-इस्रायलने हा प्रश्न चर्चेतून सोडवावा, असे आवाहन पाकिस्तानने केले आहे.

### ऑपरेशन 'मिडनाईट हॅमर'

इराणवर केलेल्या हल्ल्याबाबत अमेरिकेच्या संरक्षण विभागाने माहिती दिली आहे. इराणमधील फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या अणूकेंद्रांवर हल्ला चढवून आम्ही इराणी अणू कार्यक्रम उद्ध्वस्त केला आहे. या मोहिमेला 'मिडनाईड हॅमर' ऑपरेशन असे नाव देण्यात आले. इराणच्या अणूकेंद्रांवर हल्ला चढवताना मात्र त्यात नागरिक अथवा इराणी सैनिकांना लक्ष्य करण्यात आले नाही, असे अमेरिकन संरक्षण विभागाने म्हटले आहे.

### बी-२ बॉम्बर्सचा वापर

इराणच्या अणूकेंद्रांवर हल्ला करण्यासाठी अमेरिकेने अत्याधुनिक ६ बी-२ बॉम्बर्स विमानांचा वापर केला. सतत ३७ तास आकाशात उडणे, हवेत अनेक वेळा इंधन भरणे आणि नंतर शत्रू देशाच्या सर्वात सुरक्षित अणूकेंद्रांवर अचूक हल्ला ही अमेरिकेची लष्करी कारवाई होती. या कारवाईने रविवारी सकाळी संपूर्ण जगाला धक्का दिला. अमेरिका आणि इराणमधील तणावाला यामुळे आणखी एक धोकादायक वळण मिळाले.

## विठोबा हेल्थकेअरचा जागतिक योगदिन

**नाशिक ।** जागतिक योग दिनानिमित्त विठोबा आयुर्वेदिक दंतमंजन आणि टूथपेस्टची निर्माता कंपनी विठोबा हेल्थकेअर अँड रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडच्या हिंगणा येथील फॅक्टरीमध्ये जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. विठोबा हेल्थकेअरचे सर्व सेवक आणि कामगार यांनी एकत्र येत विविध योगासने केली. योगप्रशिक्षक श्रितीन चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सहज, सोपे योग विधी करण्यात आले. सर्वांनी नियमित योगासने करावित असा सल्ला संचालक मनीष शेंडे यांनी केले.



## किम्स मानवतामध्ये प्राणायाम



**नाशिक ।** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. रुग्णालयाच्या प्रांगणात दोन तासांचे योग सत्र पार पडले. योग प्रशिक्षका स्मिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या सत्रामध्ये विविध योगासने, प्राणायाम व ध्यान तंत्र उपस्थितांना शिकवण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक डॉ. राज नगरकर, सीओओ डॉ.निलेश सिंग मार्केटिंग हेड गॅब्रिएल स्वामी ,निखिल दळवी, सिद्धांत नागपुरे, विशाल रोकडे, विश्वानंद साळवे, रुग्ण व त्यांचे नातेवाईक, डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील सेवक उपस्थित होते.

## संविधान असेपर्यंत देश शाबूत : डॉ. कसबे

**नाशिक ।** संविधान तळागाळातील जनतेपर्यंत जाणे आवश्यक आहे, कारण संविधान असेपर्यंतच हा देश शाबूत राहील, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा लेखक डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले.

महात्मा गांधी विचार जागर स्पर्धा परीक्षेच्या निकाल व बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी शुक्रवारी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. विजेत्यांना शिष्यवृत्ती रुपी एक लाख रुपये, ५० हजार रुपये व तीस हजार रुपये रोख अशी बक्षीस देण्यात आली. कालिदास कलामंदिर येथे झालेल्या या कार्यक्रमास समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर, मविप्र संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानविकास संस्थेचे अध्यक्ष नितीन भुजबळ प्रमुख पाहुणे होते.

## नामसाधनेत मनाला सामर्थ्यवान बनवण्याची ताकद : मुळे

### संतसंग भावयात्रेत भाविक एकरुप

**नाशिक ।** मनाला सर्वप्रथम स्थिर आणि सामर्थ्यवान बनवण्यासाठी नामसाधना ही अत्यंत महत्त्वाचे कार्य करते, असे प्रतिपादन मुकुंद मुळे यांनी संतसंग भावयात्रेत केले.

शाश्वत सांगाती प्रकाशन मंडळ, पुणे यांच्यातर्फे संतसंग भावयात्रा उपक्रमातील दुसरा कार्यक्रम रविवारी झाला. प्रारंभी संयोजकांतर्फे ओमकार सुरनीस यांनी उपक्रमाचा उद्देश सांगितला. नृत्य, वाळू कला, भक्तिगीते, लघुपट इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कलात्मक पद्धतीने सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्रल्हाद महाराजांकडून अनुग्रह लाभलेले मुकुंद मुळे यांनी ओघवत्या शब्दात उपस्थित नाशिककर साधक, भाविकांना मार्गदर्शन केले. आरती चांदोरकर यांनी सूत्रसंचालन केले.

विवेक गुरव यांनी आभार मानले. आयोजक भैरवी श्रोत्री, योगेश ठकार व अनेक सहकाऱ्यांनी भावयात्रेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.



## शब्दकोड :२८४

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ | ■ | ■ | ४ | | ५ | ■ | ६ | ७ | | ■ |
| | ■ | ■ | ८ | | ९ | | | ■ | १० | ११ | | | ■ | १२ |
| ■ | १३ | १४ | ■ | १५ | | ■ | १६ | १७ | ■ | १८ | | ■ | १९ | |
| २० | | | २१ | | ■ | २२ | | | २३ | ■ | ■ | २४ | | |
| २५ | | ■ | | ■ | २६ | ■ | | ■ | २७ | | २८ | ■ | ■ | |
| | ■ | २९ | | | | ■ | ■ | ३० | | ■ | ३१ | ३२ | ३३ | |
| ■ | ३४ | | | ■ | ३५ | ३६ | | | ■ | ३७ | | | | ■ |
| ३८ | ■ | | ■ | ३९ | ■ | | ■ | ४० | | | ■ | ४१ | | |
| ४२ | | | | | | ■ | ४३ | | ■ | ४४ | ४५ | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ४६ | | ■ | ४७ | | | ■ | ■ | ४८ |
| | ■ | ■ | ४९ | | ५० | | ■ | ५१ | | ■ | ५२ | ५३ | | |
| ५४ | | ५५ | | ■ | ५६ | | ■ | ५७ | | | ■ | | ■ | |
| | ■ | ५८ | | ५९ | ■ | ■ | ६० | | ■ | ■ | ६१ | | | |
| ■ | ■ | ६२ | | | ६३ | ६४ | ■ | ६५ | ६६ | | | ■ | ■ | |
| ६७ | | | ■ | ■ | ६८ | | | ■ | | ■ | ६९ | | | ■ |

**आडवे शब्द :** १) विश्वास ठेवण्याजोगी ४) अंधःकार ६) भरपूर केस असलेला ८) रात्रीचा पती असलेला चंद्र १०) पाढ्याची उजळणी १३) बक्षीसाचा पेला १५) मस्ती, गर्व १६) उसा पासून तयार केलेले १८) शिंपण, सडा १९) वजन, बोजा २०) ज्ञानेश्वरांनी लिहलेली प्रार्थना २२) कथन वाहणे २४) पृथ्वी २५) मोठी बहिण २७) खांदा, खांद्याचा सांधा २९) अभिनेता ३०) खोटा च्या विरूद्ध ३१) पर्जन्यकाळ ३४) पादत्राण ३५) तुरूंग ३७) सैन्याचे पथक ४०) गालफड बसलेला ४१) वक्र ४२) शिखरावर पोहोचणे, अतिरेक करणे ४३) महिना ४४) सिंहाचे पिल्लू ४६) शरीर ४७) प्रयत्न ४९) भूतकाळ ५१) मूळ आधार ५२) नावातील बदल ५४) एक दातेरी हत्यार ५६) सत्ता ५७) दया, कीव ५८) तपश्चर्या ६०) पाठीला आलेला किंचित बाक ६१) पोते ६२) पोलिस ६५) रोपे, बी-बीयाणे, पेरण्याचे काम ६७) मालावरील प्रवेशकर ६८) प्रश्न ६९) निमूटपणे ओझे वाहणारे जनावर

**उभे शब्द :** १) भाजी चिरण्याचे एक साधन २) पाणी ३) नवरा ४) संध्याकाळ ५) मालाची विक्री ६) एक सुगंधी काटेरी वनस्पती ७) वस्तू एक सारख्या करण्याचे साधन ९) सोप, निद्रा ११) आवड १२) वेगवेगळा १३) जनावरांची कत्तल करणारा १४) पाणी, दूध १७) हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव १९) किंमत, निष्ठा २०) वारकऱ्यांचा ध्वज २१) खटला दाखल करणारा, वैरी २३) नटापटा २६) अनाथ २८) पत्र २९) समाज कंटकांना मोठ्या प्रमाणावर कैद करणे ३०) अफूचे बी ३२) नटण्याची आवड असलेला ३३) तापापूर्वीचे अंग मोडून येणे ३६) रक्षा बंधनाचा धागा ३७) सावली ३८) सरसकट ३९) पाठ झालेले, गळ्याशी आलेले ४३) प्रेम, ममता, पैसा ४५) वाईट इच्छा ४६) पाण्याचा पाट ४७) गमन ४८) अनुमती ४९) विधवा ५०) आजच्या आधीचा दिवस ५१) स्वयंपाकाचे शास्त्र ५३) वाघाची मावशी ५५) वस्ती ५९) घोड्याच्या खूराला लावलेली लोखंडी पट्टी ६१) उर्मट, अत्याचारी, भ्रष्ट ६३) सेवक ६४) जाडसर पीठ ६६) गुंग, निमग्न

### शब्दकोड२८३चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कौ | स | ल्या | कै | क | यी | सु | मि | त्रा | ■ | रा | स | ग | र | बा |
| र | मा | ■ | री | त | ■ | मं | ■ | स | रो | व | र | ■ | ज | ■ |
| व | न | श्री | ■ | र | ज | त | ■ | ■ | हि | ■ | ब | ळ | क | ट |
| पां | ■ | यु | ■ | बे | ट | ■ | रो | हि | णी | प | ती | ■ | ■ | ण |
| ड | ■ | त | ह | त | ■ | न | ख | ■ | ज | र | ■ | प | द | क |
| व | सा | ■ | द्ध | ■ | सं | ग | ■ | ज | ल | त | र | ण | ■ | ■ |
| ■ | व | न | पा | ल | ■ | ■ | त | वा | ■ | प | ■ | जी | व | न |
| बो | का | ■ | र | वा | न | गी | ■ | न | वा | र | णे | ■ | र | ज |
| के | श | र | ■ | ■ | य | ■ | ज | ■ | ■ | त | ■ | वा | ■ | रा |
| सं | ■ | सा | व | धा | न | ■ | न | म | न | ■ | ज | न | म | न |
| न्या | ■ | ■ | र्द | ■ | बा | ल | क | ■ | स | ■ | न | वा | ■ | ज |
| सी | ता | फ | ळ | ■ | ण | ■ | ■ | ता | न | से | न | ■ | घ | र |
| ■ | रां | ■ | ■ | पा | ■ | बे | चि | रा | ख | ■ | म | जा | ■ | ■ |
| ज | ग | र | हा | टी | ■ | का | रा | ■ | व | धा | र | णे | ■ | चो |
| व | ण | ■ | त | ल | वा | र | ■ | खा | डा | ■ | ण | ■ | थो | र |